# प्रेसनोट

दि.१९/०५/२०२२

## महावितरण कार्यालय, मंचर विभाग येथील कार्यकारी अभियंत्यावर लाच मागणी प्रकरणी कारवाई.

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
|---|---|
| गुन्हा नोंद क्रमांक | मंचर पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण गु.र.नं. २१५/२०२२ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम कलम - ७ |
| तक्रारदार | पुरुष, वय - ३८ वर्षे |
| आरोपीचे नाव व कार्यालय | लोकसेवक - हेमचंद्र हरी नारखेडे, वय - ५७ वर्षे,<br>पद - कार्यकारी अभियंता, वर्ग - १, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण विभाग मंचर, ता. आंबेगाव, जिल्हा पुणे. |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ५,०००/- (पाच हजार रूपये) |

पडताळणी दिनांक व ठिकाण :- १२/०४/२०२२, महावितरण कार्यालय मंचर, पुणे
गुन्हा दाखल दिनांक :- १९/०५/२०२२

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार हे ठेकेदार असून त्यांनी महावितरण कार्यालय, मंचर येथे इलेक्ट्रीक पोल बदलून मिळणेकामी अर्ज केला होता. इलेक्ट्रिक पोल बदलून देण्यासाठी लोकसेवक कार्यकारी अभियंता नारखेडे यानी ५ हजार रूपये लाचेची मागणी केल्याची तक्रार ला.प्र.वि. पुणे येथे दिली.

सदर तक्रारीची पडताळणी केली असता इलेक्ट्रिक पोल बदलून देण्यासाठी तक्रारदार यांचेकडे लोकसेवक कार्यकारी अभियंता नारखेडे यानी सुरवातीस ०५ हजार रूपये व तडजोडीअंती ०३ हजार रूपये लाचेची मागणी केली म्हणून लाच मागणीचा गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

ला.प्र.वि. पुणे युनिटचे पोलीस निरीक्षक श्रीराम शिंदे तपास करत आहेत.

सदरची कारवाई मा. पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. राजेश बनसोडे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. सुरज गुरव, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

शासकीय अधिकारी, कर्मचारी / लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमुद क्रमांकवर संपर्क साधण्याचे आवाहन श्री. राजेश बनसोडे, पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे यांनी केले आहे.

१. हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४
२. ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
३. व्हॉट्स-ॲप क्रमांक पुणे – ७८७५३३३३३३
४. व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००.
५. ई-मेलआयडी - पुणे dyspacbpune@mahapolice.gov.in
६. वेबसाईट - www.acbmaharashtra.gov.in
७. ऑनलाईन ॲप तक्रार - www.acbmaharashtra.net.in

(श्रीहरी पाटील)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे.